# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि.२५ मार्च २०२५

जळगाव दि.२५ (प्रतिनिधी)- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील बौध्दीक संपदा हक्क कक्षातर्फे पेटंट शोध आणि मसुदा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

नागपुर येथील राजीव गांधी बौध्दीक संपदा व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक नियंत्रक कुमार राजु यांनी विद्यार्थ्यांना पेटंट सबंधी मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले. या कार्यशाळेत पेटंटचा शोध, ऑनलाईन नोंदणी, पेटंटची मांडणी या संबंधी सर्व प्रकारचे प्रशिक्षण प्रात्यक्षीकांसह प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. विद्यापीठाअतंर्गत महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांसाठी या कार्यशाळेतील मार्गदर्शन मोलाचे ठरणार आहे.

याप्रसंगी बौध्दीक संपदा कक्षाचे समन्वयक डॉ.विकास गिते, प्रा.दिलीप हुंडीवाले, रसायन तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रा.अजयगिर गोस्वामी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व नियोजन डॉ.सारंग बारी यांनी केले तर आभार मयुर पाटील यांनी मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी